# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 11/12/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### अपघातात मृत्यु

१) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील घोटीटोक रामटेक तुमसर रोड रामटेक येथे दिनांक १०/१२/२०२३ चे १४.३० वा. ते १४.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– गजानन लक्ष्मणजी चकोले, वय ४१ वर्ष रा. बोरी ता. रामटेक याचे मोठे वडील **मृतक नामे– जनार्धन चकोले, वय ७५ वर्ष, रा. बोरी** हे मोटरसायकल क्र. एम. एच.– ४०/ए.डी– ३०२३ ने घोटीटोक येथुन बोरी गावाकडे परत येत असता समोरून मारूती स्विफ्ट डिझायर गाडी क्र एमएच ३६ एजी ७२८८ च्या चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन समोर जाणाऱ्या फिर्यादीचे मोठे वडिलाचे मोटारसायकलला पाठीमागुन धडक मारल्याने दोन्ही पायाला व डोक्याला मागील बाजुस गंभीर दुखापत होवुन मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ), सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक गोपान डोकरमारे मो. नं ९७६४२८५९८८ हे करीत आहे.

२) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मौजा एन. एच. ५३ भंडारा ते नागपुर रोड माथनी शिवार मौदा येथे दिनांक १०/१२/२०२३ चे २३.५० वा. ते दि. ११/१२/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान अनोळखी पागल मृतक पुरूष वय अंदाजे ३५ ते ३७ वर्ष असुन दि. १०/१२/२३ ते दि. ११/१२/२३ चे रात्री दरम्यान माथनी शिवारात भंडारा ते नागपुर रोडच्या स्लोपवर पागल पणाच्या भरात नग्न स्थीतीत काळया रंगाचा कंबल ओढुन झोपला असता कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजी पणाने चालवुन त्याचे वरून नेवुन अपघात करून पळुन गेला त्यामुळे अनोळखी पागल इसम हा गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय आनंदराव वाडीभस्मे वय ५८ रा. माथनी ता. मौदा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवि सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा असलम नवरंगाबादे ब.नं. १७१ मो.क्र. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील चेक पोस्ट केळवद येथे दिनांक १०/१२/२०२३ चे ११.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे– मो. अनवरुल्लाह खान इनायत खान, वय २९ वर्ष, रा. सावंगा सगम ता. सौसर हे सावंगा वरुन केळवदला फळ घेण्याकरिता येत असता **आरोपी नामे– शेख शकील शेख करीम, रा. सावंगा सगम ता. सौसर** हे सुध्दा सावंगा वरुन केळवदकडे आपले मोटरसायकल बजाज क्र. एम. पी २८/एन डी– ७८७० ने भरधाव वेगाने केळवदकडे येत असता फिर्यादीच्या मोटरसायकलला असलेला कोबंडयाचा पिजंराचा धक्का लागल्याने फिर्यादी हे गाडी वरुन खाली पडले फिर्यादी याने आरोपी यास म्हटले तु मला धक्का का मारला यावरुन आरोपीने फिर्यादी सोबत झगडा भांडन केले व शिवीगाळ करुन पडला असलेला दगड हातात घेवून मारला तो फिर्यादीच्या डोक्याला लागला व हातभुक्याने मारहाण केली व पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, २७९, ३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चलपे पोस्टे केळवद मो. नं. ९७६७५८१०४४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**